# अधिसूचना

क्र. : १५७/२०२२ दिनांक : ६/१०/२०२२

**विषय - अधिसभा, विद्या परिषद आणि अभ्यास मंडळ निवडणूका-२०२२**
नामनिर्देशन शुल्क निश्चितीबाबत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ तील विविध तरतूदी अंतर्गत अधिसभा, विद्या परिषद आणि अभ्यास मंडळांच्या निवडणूका घेण्यात येणार आहे. एकरूप परिनियम क्र. १/२०१७ मधील तरतूदीनुसार निवडणूकीसाठी उभे राहू इच्छिणाऱ्या उमेदवारांकडून नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी प्रत्येक नामनिर्देशनपत्रासोबत विद्यापीठाने विहित केलेले नामनिर्देशन शुल्क जोडणे आवश्यक आहे. निदेश क्र. ५५/२०२२ मधील परिच्छेद ४(सी) नुसार नामनिर्देशन शुल्क विहित करण्याचे अधिकार मा.कुलगुरूंना दिलेले आहेत.

सर्व संबंधितांच्या माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, सदहू निदेशान्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मा.कुलगुरूंनी रू. ५००/- (अक्षरी रू. पाचशे फक्त) नामनिर्देशन शुल्क निश्चित केले आहे. सदर शुल्क हे रोखीने असल्यास विद्यापीठ पावतीद्वारे किंवा कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे नांवे काढलेल्या धनाकर्षाद्वारे नामनिर्देशनपत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

स्वा./-
(डॉ.तुषार देशमुख)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****